पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.क्रिडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक ८

**सभावृत्तांत**

दिनांक - १९/०९/२०१३ वेळ - दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक १९/०९/२०१३ रोजी दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. बोकड रामदास गेणभाऊ - **सभापती**
२) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
३) मा. वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४) मा. उल्हास शेट्टी
५) मा. वाघेरे प्रभाकर नामदेव
६) मा. भारती फरांदे
७) मा. प्रसाद शेट्टी
८) मा. काळे विमल रमेश
९) मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.गावडे – नगरसचिव, मा.पानसरे – क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-**

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिका ३१ वा वर्धापनदिन २०१३ अनुषंगाने विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे - मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) प्रभाग क्र.४७ (काळेवाडी) मध्ये हेल्थ क्लब सुरु करणेबाबत - मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) महिलांसाठी व्यायामशाळा सुरु करणे - मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) मा.आनंद झडपे यांची लॉन टेनिस क्रीडा प्रशिक्षक मानधनावर नियुक्त करणेबाबत - मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) राजेशाही मित्र मंडळ पिंपरी वाघेरे या मंडळास कै.काशिबा शिंदे बॅडमिंटन हॉल चालविण्यास देणेबाबत - मा.विमल काळे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) आण्णासाहेब मगर स्टेडियम अद्ययावत करणेबाबत - मा.मंदाकिनी ठाकरे, मा.वसंत लोंढे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) व्यायामशाळेत साहित्य पुरविणेबाबत - मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११) क्रिकेट पीच व त्या पीचसाठी नेट (जाळी) बसविणेबाबत - मा.वसंत लोंढे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१२) प्रभाग क्र.११ से.नं.२२ राजनगर मधील कै.मधुकर पवळे व्यायामशाळा जयभवानी तरुण मंडळास चालविण्यास देणेबाबत - मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१३) हेडगेवारभवन मैदानावरील स्केटींग मैदानावर (इनडोअर कोर्ट, प्रबोधनकार ठाकरे यमुनानगर धर्तीवर करणे) गोलाकार शेड उभारणीबाबत - मा.वसंत लोंढे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१४) पॅरिस (फ्रान्स) योगासन वर्ल्ड कप स्पर्धेबाबत - मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१५) कोमल देशमुख हिची राष्ट्रीय सायकलिंग प्रशिक्षण शिबीरासाठी निवड झाल्याने अस्ताना (कझाकस्तान) येथे होणा-या सायकलिंग स्पर्धेसाठी आर्थिक सहाय्य मंजूर करणेबाबत मा.वसंत लोंढे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव.

----------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ३० | विषय क्रमांक – १ |
| दिनांक - १९/०९/२०१३ | विभाग - क्रीडा |
| सूचक - मा.वसंत लोंढे | अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे |

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/८१६/२०१३, दि.३१/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

निविदा नोटीस क्र.१/२००७-०८ अन्वये जलतरण तलाव पाणीशुध्दीकरण, परिसर स्वच्छता, देखभाल व यांत्रिक दुरुस्ती कामाची ५ वर्षाची मुदत दि.१६/०७/२०१३ रोजी संपुष्टात आल्याने नव्याने निविदा प्रक्रिया पुर्ण करुन कामाचे आदेश देईपर्यंत तीन महिन्याचा कालावधी लागणार असल्याने ४थ्या वर्षाच्या दराने ५ व्या वर्षाचे पुढील ३ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/६८६/२०१३, दि.१२/०८/२०१३ अन्वये मे.सुमित स्पोटर्स अन्ड फिटनेस इक्विपमेंटस, चिंचवड, पुणे १९ व मे.वरदायिनी एंटरप्राईजेस चिंचवड, पुणे १९ यांना प्रस्तावात नमुद केलेल्या दराने माहे नोव्हेंबर २०१३ पर्यंत कालावधीकरीता या पुर्वी केलेल्या करारनाम्यातील अटी व

शर्तीनुसार त्यांचे नावापुढे नमुद केलेल्या ११ जलतरण तलावांचा आजुबाजुचा परिसर, डेक एरिया, कार्यालय पाय-या स्वच्छता, स्वच्छतागृहे, स्नानगृह इ. रोजचेरोज साफ सफाई व जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, देखभाल व या यांत्रिक दुरुस्ती कामाचे आदेश दिल्याने त्याकामी येणा-या खर्चास मान्यता व सदर कामाची ई-निविदा नोटीस क्र.१/२०१३-१४ ची कार्यवाही करणेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव बहुमताने मंजूर झाला.

----------

ठराव क्रमांक – ३१ विषय क्रमांक – २
दिनांक - १९/०९/२०१३ विभाग - क्रीडा
सूचक - मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक - मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/२९३/२०१३, दि.०३/०९/२०१३

१) वैदुवस्ती व्यायामशाळा, पिंपळे गुरव, २) बळवंत चिंचवडे व्यायामशाळा, चिंचवड व ३) मुंजोबा चौक पिंपळे सौदागर व्यायामशाळा या व्यायामशाळा वगळता प्रस्तावात नमुद उर्वरित २८ व्यायाम शाळांना दि.०१ एप्रिल २०१३ ते ३० नोव्हेंबर २०१३ अखेर सेवाशुल्क देऊन म.न.पा. व्यायामशाळा कराराने चालविणेस देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३२ विषय क्रमांक – ३
दिनांक - १९/०९/२०१३ विभाग - क्रीडा
सूचक - मा.भारती फरांदे अनुमोदक - मा.विमल काळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/२९८/२०१३, दि.१०/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरिक व विद्यार्थी खेळाडू यांचे सोयीचे दृष्टीने जास्तीत जास्त सराव करता यावा म्हणून म.न.पा.चे लॉन टेनिस कोर्ट, स्क्वॅश कोर्ट व बॅडमिंटन हॉल या क्रीडा सुविधांची १ ऑक्टोंबर २०१३ पासून साप्ता.सुट्टी रविवार ऐवजी शुक्रवार अशी करणेस व तशी दुरुस्ती ऑनलाईन बुकींग सेवेमध्ये करुन घेणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -**

ठराव क्रमांक – ३३ विषय क्रमांक – ४

दिनांक - १९/०९/२०१३

सूचक - मा.वसंत लोंढे अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

मनपा ३१ वा वर्धापनदिन २०१३ अनुषंगाने सन्मा.सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांना चहा अल्पोपहार, बक्षिसे खरेदी, पंच मानधन, कॅप्स (टोपी) खरेदी, क्रीडा साहित्य खरेदी व स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या सन्मा.सदस्य, अधिकारी व कर्मचारी याकरीता ट्रॉफीज, बक्षिसे खरेदी, टी शर्ट, महिलांसाठी स्वेट शर्ट खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर छपाई तसेच क्रिकेट स्पर्धेच्या दिवशी उपस्थित अधिकारी, पदाधिकारी व नगरसदस्य, पत्रकार व कर्मचारी यांना द्यावयाचे भोजन इत्यादीकामी अंदाजे एकूण र.रु.३,२५,०००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदरचा खर्च क्रीडा निधी, वार्षिक स्पर्धा क्रीडा कला या लेखाशिर्षातून करणेस मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३४ विषय क्रमांक – ५

दिनांक - १९/०९/२०१३

सूचक - मा.वसंत लोंढे अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.४७ ज्योतिबानगर (काळेवाडी) येथील जुनी व्यायामशाळा (तालीम) आहे. त्याची अवस्था खुप दयनिय झालेली आहे. तालिमीच्या मातीमध्ये कीडे पडलेले आहेत. ती गेल्या १० वर्षापासून बंद आहे. तरी तालमीच्या ठिकाणी हेल्थ क्लब सुरु करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३५ विषय क्रमांक – ६

दिनांक - १९/०९/२०१३

सूचक - मा.वसंत लोंढे अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

जिजाऊ सांस्कृतिक भवनामधील व्यायामशाळेत महिलांसाठी व्यायामशाळा सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३६ विषय क्रमांक – ७

दिनांक - १९/०९/२०१३

सूचक - मा.वसंत लोंढे अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

मा.आनंद झडपे यांची लॉन टेनिस प्रशिक्षक म्हणून पालिकेच्या दत्तक योजनेत नियुक्ती झाली आहे. त्यांना प्रतिमहा र.रु.१५,०००/- (अक्षरी र.रु.पंधरा हजार फक्त) इतर क्रीडा प्रशिक्षकांप्रमाणे मानधन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७ विषय क्रमांक – ८

दिनांक - १९/०९/२०१३

सूचक - मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी वाघेरे येथील कै.काशिबा शिंदे बॅडमिंटन हॉल राजेशाही मित्र मंडळास र.रु.२,०००/- तत्वावर नियमानुसार चालविण्यास मिळणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८ विषय क्रमांक – ९

दिनांक - १९/०९/२०१३

सूचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक - मा.विमल काळे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२८ मध्ये आण्णासाहेब मगर स्टेडियम येत असून त्या ठिकाणी स्विमिंग टँक, बॉक्सिंग, गिर्यारोहण, क्रिकेट, ग्राऊंड या खेळाचे अद्ययावत काम करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९ विषय क्रमांक – १०

दिनांक - १९/०९/२०१३

सूचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

वॉर्ड क्र.२० चिंचवडेनगर प्रभाग दत्तात्रय मरळ उद्यानामध्ये श्री गणेश व्यायाम शाळेमध्ये साहित्य खुपच कमी आहे. त्या साहित्याची तीन वर्षापासून मागणी होत असून

अद्याप व्यायामशाळेत पुर्णपणे साहित्य मिळालेले नाही. सदर व्यायामशाळेस साहित्य देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४० विषय क्रमांक – ११

दिनांक - १९/०९/२०१३

सूचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक - मा.विमल काळे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव -

मोरया गोसावी क्रीडांगण, केशवनगर, चिंचवड या ठिकाणी क्रीडांगणच्या एका कोप-यामध्ये प्रभागातील मुलांना खेळण्यासाठी सिमेंट पीच व त्यापिचवर तीनही बाजूने जाळी (नेट) बसवून देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१ विषय क्रमांक – १२

दिनांक - १९/०९/२०१३

सूचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

विषय - प्रभाग क्र.११ से.नं.२२ राजनगर मधील कै.मधुकर पवळै व्यायामशाळा जयभवानी तरुण मंडळास चालविण्यास देणेबाबत.

विषय क्र.१२ चा विचार दि.०४/१२/२०१३ चे सभेत करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२ विषय क्रमांक – १३

दिनांक - १९/०९/२०१३

सूचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक - मा.भारती फरांदे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव -

हेडगेवार भवन मासुळकर कॉलनी येथे स्केटींग मैदानावर ( इनडोअर कोर्ट, प्रबोधनकार ठाकरे यमुनानगर धर्तीवर करणे ) गोलाकार पत्राशेड उभारणी करुन अद्ययावत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४३ विषय क्रमांक – १४

दिनांक - १९/०९/२०१३

सूचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

कुमारी वैष्णवी आंद्रे हिने –हीदमीक पेअर योगासन स्पर्धेमध्ये रौप्य पदक मिळवले असून हिची पॅरिस योगासन वर्ल्ड कप या आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी भारताच्या योग संघामध्ये निवड झाली असून तिच्या स्पर्धेसाठी येणारा नियोजित खर्च र.रु.१,४०,०००/- आहे. तरी या स्पर्धेमध्ये

सहभागी होण्यासाठी मनपा तर्फे मदत मिळण्यास समितीची शिफारस आहे परंतु प्रशासनामार्फत योग्य तो निर्णय घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४४ विषय क्रमांक – १५

दिनांक - १९/०९/२०१३

सूचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक - मा.विमल काळे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव -

कोमल देशमुख हिची राष्ट्रीय सायकलिंग प्रशिक्षण शिबीर, नवी दिल्ली दि.२४ ऑगष्ट ते १३ सप्टेंबर २०१३ करीता निवड झाली असून अस्ताना (कझाकस्तान) येथे होणा-या ३४ व्या आशियाई सायकलिंग अजिंक्य स्पर्धेच्या तयारीसाठी सायकल व इतर क्रीडा साहित्य खरेदी करणेस तिला मनपा कडून आर्थिक सहाय्य रु.५०,०००/- मंजूर करणे मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(बोकड रामदास गेणभाऊ)
**सभापती**
मा.क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ८७९ /२०१३
दिनांक – २४/०९/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.